# सूड !

"अत्यंत कोमल मनाची स्त्री सुद्धा, तिचा विश्वासघात झाल्यास किती क्रूर होऊ शकते अन् विश्वासघातक्याचा सूड उगविण्यासाठी वाटेल ते कृत्य करायला कशी मागेपुढे पाहात नाही याचा मला चांगलाच अनुभव माझ्याच जीवनात आलाय. तोच मी तुम्हाला सांगतो."

प्रवासात रंगलेल्या गप्पागोष्टी स्त्रियांच्या स्वभावाबद्दल चर्चा चालू असताना माझा सहप्रवासी इथं किंचित् थांबला अन् खिशातून रूमाल काढून त्यानं आपला फिक्कट चेहरा पुसला.

गाडी वेगात आली होती. बाहेर आकाश काळ्या ढगांनी भरून आलं होतं. त्यामुळे वातावरणात रात्रीचा काळोख अधिकच दाट वाटत होता. त्या पार्श्वभूमीवर आमच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातील विजेचा दिवा. जास्तच मंद वाटत होता, पिवळट उजेड फेकत होता. त्याच्याभोवती घोंगावत असलेल्या एका किड्याकडे टक लावून पाहात माझा सहप्रवासी पुढे सांगू लागला.

"माझी बायको लग्नानंतर दोन वर्षांनी पहिल्या बाळंतपणातच वारली. दिसायला अशिय सुंदर अन् नाजुक ; स्वभावानं प्रेमळ अन् मनानं हळूवार ! माझं तिच्यावर अतिशय प्रेम होतं. अन् ह्यात काही नवलं नव्हतं. पण तिला तर माझ्याबद्दल एकाप्रकारची भक्तीच वाटत असली पाहिजे, कारण आपल्याकडून सर्व तऱ्हेचं सुख मला मिळावं असा तिचा नेहमीच जाणीवपूर्वक प्रयत्न असे. अन् तिच्या ह्याच गुणावर मी लुब्ध होतो, तिच्यावर जिवापलीकडे प्रेम करीत होतो. इतकं की, तिच्या आकस्मिक मृत्यूनं माझ्या मनाला जोरदार धक्का बसला. मी अगदी वेडापिसा होऊन गेलो. तिच्या निरनिराळ्या आठवणी काढण्यात दिवस घालवू लागलो. कामधंद्यातलं माझं लक्ष पार उडालं. एक प्रकारची विरक्ती मनास आली.

"आम्हा लिंगायत वाण्यात शवाचे दहन करीत नाहीत. ते पुरण्याची पद्धत आहे. त्यानुसार मी तिचं दफन गावातून वाहणाऱ्या नदीच्या पलीकडील तीरावरील स्मशानात केलं अन् त्या जागेवर तिचं एक सुरेखसं स्मारक बांधलं. आईवडील माझ्या लग्नाआधीच गेले असल्यानं घरात एकदोन नोकराशिवाय आता कुणीच उरलं नव्हतं. अन् म्हणूनच मी एकटा असताना तिच्या अनेक आठवणींनी भरलेली ती वास्तु मला अगदी खायला यायची, मला गुदमरवून

सोडायची. विमनस्क होऊन मी बाहेर पडायचो अन् ह्या स्मशानात यायचो.

''तासन् तास मी तिथं तिच्या स्मारकापाशी घालवायचो. माझ्या मनाला तिथं थोडी शांती मिळायची. ती आपल्याला सोडून गेली ही भावना तात्पुरती नाहीशी व्हायची. पोळलेल्या मनावर एक प्रकारचा शीतल लेप लावावा तसं वाटायचं.... आधार मिळाल्यासारखं वाटायचं....

''पण हे किती दिवस चालणार होतं ? अशाप्रकारे मी किती दिवस घालवणार होतो ? आजूबाजूच्या लोकांनी मला आता वेड्यात काढायला सुरुवात केली होती. माझ्याबद्दल त्यांना वाटणारी सहानुभूती आता नाहीशी होऊ लागली होती अन् त्यांच्यात कुजबूज सुरू झाली होती. मला त्या स्मशानवैराग्याच्या झटक्यातून बाहेर काढण्यासाठी माझ्या काही जवळच्या आप्तमित्रांनी आता चंग बांधला होता अन् मला मुली सांगून यायला लागल्या होत्या. ह्या प्रकारानं माझ्या डोक्यात एक संतापाची जोरदार तिडीक उठली अन् त्या झटक्यात मी एक निर्णय पक्का केला. घरदार नि जमीनजुमला विकून टाकला अन् मुंबईस आलो. एक भरभराटीत चालेल्या सुरक्षित धंद्यात मी जवळचा सर्व पैसा गुंतवला अन् त्यावरील कमाईत मी ऐषारामी जीवन जगू लागलो. मुंबईतील बहुरंगी अन् बहुढंगी जीवनात रमून गेलो. मनाची व्यथा विसरल्यासारखं झालं.

''फावल्या वेळचा उद्योग म्हणून दिवसा मी एक अद्ययावत् फर्निचरचे दुकान चालवू लागलो अन् रात्री करमणुकीसाठी निरनिराळ्या थिएटरांना भेटी देऊ लागलो, नाटकं पाहू लागलो, गाणं ऐकू लागलो. शहरातील एक अद्ययावत नाइट क्लबचाही मी सभासद झालो. तिथं होणाऱ्या कार्यक्रमांना हजर राहू लागलो. उद्योगपतींची तिथं माझी ओळख झाली. त्यांच्या तरुण, सुंदर बायका, मुली, मैत्रिणी ह्यांच्या धुंदफुंद सहवासात भान विसरू लागलो. विलायती सुरांनी भरलेल्या, अतिशय माफक उजेडानं स्वप्निल बनलेल्या, अन् उत्तमोत्तम मद्यांच्या फसफसणाऱ्या बाटल्यांनी धुंद बनविलेल्या क्लबमधील वातावरणात बेहोष राहू लागलो.... अत्यंत अपुऱ्या वस्त्रात प्रकटलेलं शहरातील अप्रतिम लावण्याचं निरनिराळं दर्शन घेत....

''लिलीची नि माझी पहिली ओळख झाली ती इथंच. लक्षाधीश बापाच्या ह्या एकुलत्या एक मुलीनं मला पहिल्या भेटीतच भुरळ घातली. खरोखरच लिलीच्या फुलासारखी नाजूक अशा ह्या केतकीवर्णाच्या फॅशनेबल तरुणीनं मला प्रथमदर्शनीच घायाळ केलं. मुद्दाम तिची ओळख करून घेऊन मी

निरनिराळ्या प्रसंगानं तिच्या भेटीगाठी घेऊ लागलो.

"ओळख वाढली, सहवास वाढला तसातसा माझा धीरही वाढत गेला अन् पुढं तिचं प्रियाराधन करून तिचंही आपल्यावर प्रेम बसविण्यात मला हळूहळू यश मिळत गेलं. तिचं मन जिंकल्यावर लवकरच मी तिला रीतसर मागणी घातली, अन् पुढे ती घटना घडली नसती तर आमचं लग्न नक्कीच झालं असतं !"

भूतकाळात लागलेली नजर काढून घेऊन त्यानं क्षणभर माझ्याकडे पाहिलं. माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलं असावं, कारण तो पुढे म्हणाला. "उन्हाळ्याचे सरते दिवस होते ते. आकाश अधूनमधून अंधारून येण्यास सुरुवात झाली होती. पावसानं एकदोनदा नुकतीच शहरात धूळभेट दिली होती. अन् वातावरणाचं तापमान किंचित् उतरलं होतं. हवेत सुखकर थंडावा आला होता.

"अशाच एका अंधारलेल्या सायंकाळी मी लिलीसह क्लबमध्ये जाण्यास निघालो होतो. गाडीनं नुकताच कुठं जोराचा वेग घेतला होता. शेजारील सीटवर बसलेल्या लिलीच्या गळ्यात डावा हात टाकून मी उजव्या हातात स्टिअरींग व्हील सांभाळत होतो. लिली माझ्या हातावर रेलून धुंद बसली होती. तिच्या उघड्या खांद्यांचा हाताला होणारा मखमली स्पर्श अन् त्यावर भुरभुरणारे तिचे बॉब केलेले रेशमी केस ह्यांची एक वेगळीच नशा माझ्या मस्तकात चढू लागली. अन् गाडीचा वेग मला नकळत आणखी वाढला. तशा स्थितीतच समोरून वाजतगाजत येणाऱ्या वरातीकडे माझं लक्षं गेलं. नवरीकडे मी सहज पाहिलं अन् दचकलो.

"तिचा चेहरा हुबेहुब माझ्या बायकोसारखा होता !"

काही क्षणच माझं भान हरपलं. नकळत ॲक्सिलेटरवरचा पाय जोरात दाबला गेला अन् तेव्हाच स्टिअरींगवरचा ताबा क्षणभर सुटला. एक जोरात उडी घेऊन गाडी वेगानं वाकडीतिकडी वळणं घेत धावली अन् रस्त्याच्या कडेला सुस्कारात उभ्या असलेल्या स्टीमरोलरवर जोरात आदळली.

मी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या चेहऱ्यावर वाकून पाहत असलेली नर्स मला दिसली. मी डोळे उघडताच तिचा चेहरा फुलला. मोठ्या मुष्किलीनं मी वाचलो असं तिनं मला सांगितलं. अपघातात माझ्या डोक्याला जबरदस्त मार बसला होता. एक बरगडीही दुखावली होती. डोक्यात घुसलेल्या काचा शस्त्रक्रिया करून काढाव्या लागल्या.... थोडक्यात, माझा पुर्नजन्मच झाला

होता !

मी परमेश्वराचे मनातल्या मनात आभार मानले अन् नंतर लिलीची चौकशी करू लागलो. तिची मला चिंता वाटू लागली; पण तीही थोडक्यात वाचली अस मला त्याच नर्सनं सांगितलं अन् माझ्या हृदयावरचा भार हलका झाला, पण डिस्चार्ज देताना डॉक्टरांनी माझ्या खांद्यावर धीराचा हात ठेवून गंभीरपणे म्हटलं,

''आता तुम्हाला सांगून टाकण्याला हरकत नाही ! लिली जागच्या जागी ठार झाली होती. तिच्या गळ्यात ....''

''पुढचं ऐकायला मी थांबलोच नाही. मला फार जबर धक्का बसला. अपराधीपणाच्या भावनेनं माझा पगडा घेतला. मी स्वत:लाच दूषणं देऊ लागलो. तिच्या मृत्यूचं खापर आपल्या दुर्दैवावर फोडू लागलो. तिच्या जीवनात आपण आपला प्रवेश करून घेतल्यानं आपणच तिच्या मृत्यूला कारण झालो असं समजू लागलो. माझी मन:स्थिती त्यावेळी एकंदरीत विचित्र झाली असावी. त्याशिवाय का असले तर्कहीन विचार माझ्या मनात दृढपणे ठाण मांडून बसले होते ?''

आपल्या त्यावेळच्या मन:स्थितीचा आताही विचार करीत तो काही वेळ डोळे मिटून स्तब्ध बसला. नंतर डोळे उघडून माझ्यावर नजर रोखून तो पुढे म्हणाला ----

''ह्या धक्क्यातून आपण आता कधीच सावरणार नाही असं मला त्यावेळी वाटलं. पण चित्रपटाच्या पडद्यावर जसं आधीचं दृश्य पुसट होत जाऊन त्यातून दुसरं दृश्य ठळक व्हायला लागतं तशी लिलीची स्मृती माझ्या मन:पटलावरून पुसट होत गेली, अन् त्यावर पुन्हा माझ्या दिवंगत पत्नीची आकृती स्पष्ट होऊ लागली. पूर्वी जसा मी तिच्या आठवणीत गुंगत राहत असे तसाच आताही परत राहू लागलो.''

''कधीकधी आम्ही दोघांनी एकत्र घालवलेल्या दोन वर्षांच्या काळातील अनेक आठवणींनी मनात धुमाकूळ घालावा, तर कधी आम्ही दोघंच गावाबाहेर दूर फिरायला गेलो असल्यासचं दृश्य डोळ्यांसमोर तरळत राहावं.... रात्री झोपेत पडलेल्या स्वप्नात मला ती स्पष्ट दिसायची. तिचा चेहरा खेदयुक्त असायचा अन् नजरेत कसलीतरी याचना !

''नंतर नंतर ती माझ्या खोलीतच आसपास वावरत आहे. असेच मला

भास होऊ लागले. जागेपणीही तिचा तो खेदपूर्ण चेहरा नजरेसमोर तरळू लागला. भर दिवसा एकांतात असे भास मला होऊ लागले. स्वप्न नि सत्य ह्यातील भेदच मला कळेनासा झाला.''

''तिचा तो तसा चेहरा जसजसा वारंवार दिसू लागला तसतसे तिच्याविषयीच्या करुणेनं माझं मन भरून यायला लागलं. मी स्वत:वरच ठपका ठेवायला सुरुवात केली. मी तिला का विसरलो ? तिच्या सहवासाच्या खाणाखुणा मी आपल्या जीवनातून का पुसून टाकल्या ? गाव सोडल्यानंतर मी तिच्या स्मारकाला एकदाही का भेट देऊ नये ? लिलीच्या मोहात आपण इतके कसे वाहत गेलो ?.... पश्चातापानं मी तेव्हा इतका भारला गेलो की एके दिवशी जेव्हा मी खरोखरच गावाकडे निघालो तेव्हा मला मोकळं वाटू लागलं.''

पावसाचे टपोरे थेंब खिडक्यातून आत येऊ लागले तसा मी उठलो. आणि खिडक्यांची तावदानं लावू लागलो. तेवढा वेळ तो थांबला. मी पाहिलं तो आता वर्तमानकाळात राहिला नव्हता. मी जागेवर बसताच परत त्यानं आपली कहाणी सुरू केली....

''सायंकाळच्या त्या धूसर प्रकाशात स्मशान मला ओळखूच आले नाही. एका बाजूची भिंत पडायला आली होती. हलणाऱ्या दगडांचे नि निखळलेल्या चुन्याचे सांगाडे, अशी इतर भिंतींची स्थिती होती. प्रवेशद्वाराचे नुसते दोन स्तंभ उभे होते. फाटकाचा पत्ता नव्हता. आसमंतात धुकं दाटलं होतं, अन् त्यात एका अज्ञात पक्षाचा उदासवाणा स्वर विरघळत होता.''

''दाट गवत अन् वेलींचा जमिनीवर झालेला गुंता यातून वाट काढत मी बायकोच्या स्मारकाजवळ आलो असेल नसेल तोच काही अंतरावर एक स्त्री मला पाठमोरी उभी असलेली दिसली. तिनं नेसलेलं शुभ्र वस्त्र धुक्यात मिसळल्यासारखं विरविरीत दिसत होतं. पाठीवर केस मोकळे सुटले होते. एखादी छाया धुक्यात तरंगत आहे असं भासत होतं. माझी चाहूल लागताच तिनं माझ्याकडे आपला चेहरा वळवला अन्....

''माझं हृदय थांबलं असं मला एक क्षण वाटलं. तिथला तो चमत्कारिक उजेड, धुकं अन् त्यात अगदी माझ्या पत्नीसारखा चेहरा असलेली ती स्त्री ! क्षणभर मी भारल्यासारखा झालो.

''भानावर येताच त्या स्त्रीचा परिचय करून घ्यावा अशी उत्कट इच्छा मला झाली. पण ती तशीच महत्प्रयासानं दाबून मी बायकोच्या समाधीकडे

वळलो. तिच्या समाधीवर वाढलेलं गवत, वेली, मुळ्या वगैरे कचरा साफ करू लागलो. मनात त्याचवेळी अनेक शंकाकुशंकांनी फेर धरला. एखादी स्त्री स्मशानात एकटी येऊ शकते ह्यावर माझा विश्वास बसेना, आणि दुसरं म्हणजे तिचा चेहराही अगदी माझ्या पत्नीसारखा....''

''अन् एकदम माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मला आठवलं, वरातीतील नवरीमुलगी ती हीच ! इथं कशी ? कशासाठी आली ? काय करीत आहे ? इत्यादी प्रश्नांच्या चक्रात मी भ्रमत असतानाच अगदी माझ्या बायकोच्याच स्वरात जवळच कुणीतरी म्हणालं.

''फार जोराचा पाऊस येणारं असं वाटतं. परतायला हवं आता !''

मला परिचित असा स्वर कानावर पडताच मी चमकून वर पाहिलं. ती स्त्री माझ्याकडेच पाहात होती. माझ्या चेहऱ्यावरील भावांचा तिनं कोणता अर्थ लावला कुणास ठाऊक पण ती पुढे म्हणाली.

''जाणारे जातात ! मागं राहिलेल्यांना जगत राहावंच लागतं. नाही का?''

''एकूण तिच्या बोलण्यात सांत्वन होतं तर ! मी उठून उभा राहिलो अन् कपडे झटकत म्हणालो, ''चला !''

''आम्ही जोडीनं स्मशानाबाहेर पडलो. रस्त्यानं चालताना माझ्या मनात राहूनराहून एकच प्रश्न उभा राहत होता की ती कुणाच्या स्मारकाला भेट द्यायला आली होती ? तिचं निश्चितच त्या व्यक्तीवर निरतिशय प्रेम असलं पाहिजे. कारण त्याशिवाय का ती एकटी स्मशानात यायचं धाडस करील ?''

''पण तिच्या चेहऱ्यावरील अतीव खेद पाहून मला वाटेत काही विचारण्याचा धीर झाला नाही. तिनंही संभाषण चालू करण्याचा काही प्रयत्न केला नाही. मूकपणेच आम्ही दोघं आपापल्या विचारात गुरफटलेले असे रस्त्यानं चालत राहिलो. अचानक मला आठवलं की स्वप्नात पत्नीचा चेहरा असाच दिसायचा, खेदपूर्ण नि कसलीतरी याचना !

''इतक्यात जोराचा वारा वाहू लागला नि क्षणात टपोऱ्या थेंबांचा मारा सुरू होऊन आम्ही चिंब ओले झालो. वाटेवरच्या एका मोठ्या पिंपळाच्या झाडाकडे बोट दाखवून तिथं आसरा घ्यावा असं मी तिला सुचवलं.

''आता काळोख चांगलाच दाट होऊ लागला होता अन् इकडे झाडाखाली उभं असताना माझ्या मनात एकप्रकारची विचित्र अस्वस्थता, मनावर

एकप्रकारचं अज्ञात दडपण येऊ लागलं होतं. तिचं आपल्या बायकोच्या चेहऱ्याशी असलेलं साम्य तिला सांगून टाकण्यासाठी माझं मन आतल्या आत अगदी आतुर होऊन उठलं. अन् ती उबळ दाबून टाकताना माझा जीव अगदी गुदमरल्यासारखा झाला. शेवटी अगदी राहावेनासं होऊन जीभेवर शब्द रेटत मी म्हटलं, ''तुमचं... तुम्हाला....''

''पण तिनं अशा काही तीव्र नजरेनं माझ्याकडे पाहिलं की मी वेगळंच बोलून गेलो---

''मला वाटतं तुम्ही ह्याच गावातल्या ?''

''तिनं मानेनंच होकार दिला. थोडा धीर येऊन मी बोलणं सुरू ठेवलं.''

''दहा वर्षापूर्वी माझी पत्नी वारली. त्यावेळी मी इथं रोज येत असे. हे स्मशान तेव्हा चांगल्या स्थितीत होतं...'' तिनं माझ्याकडे वळून पाहिलं. तेवढ्यानं उत्तेजित होऊन मी पुढे म्हणालो,

''मुंबईला जाण्यापूर्वी मी शेवटची भेट इथं दिली होती. त्यानंतर मात्र आजच येतो आहे.''

''पत्नीवर तुमचा अतिशय जीव होता खरं नां ?'' अचानक कुजबुजल्या सूरात तिनं पृच्छा केली नि मी ओशाळलो. अपराधीपणाच्या सूरात मी उत्तरलो, ''अतिशय ! तिच्यासारखी पत्नी दुसरी पुन्हा मिळायची नाही.''

''हेसुद्धा असंच म्हणायचे !'' तिनं एक दीर्घ उसासा टाकला, अन् मला सगळा उलगडा झाला. विवाहानंतर लगेच तिच्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली होती म्हणायची !

''तिला काही सांत्वनपर बोलावं असं मला वाटलं, पण इतक्यात पाऊस थांबला. त्याबरोबर आपल्याच विचारात गुरफटलेल्या स्थितीत डोकं किंचित समोर झुकवून ती रस्त्यावर समोर निघाली. मी पण मागून चालू लागलो.''

गाडीनं रूळ बदलले तसा थोडा खडखडाट झाला. वेग मंद होत होत गाडी कुठल्यातरी छोट्या स्टेशनवर थांबली. आमच्या डब्यात कुणीच चढलं नाही. एक मिनिटातच गाडीनं स्टेशन सोडलं. रूळ बदलल्याचा पुन्हा खडखडाट झाला अन् एक जोरात शिटी देऊन गाडी वेगात आली. किंचित खाकरून तो पुढे सांगू लागला-

''नदीवरील पूल ओलांडून गावाकडे आम्ही निघालो होतो. नदीच्या प्रवाहाकडे पहात तिनं सहज विचारलं, ''तुम्ही दुसरा विवाह -''

"केला नाही." मी झटकन सांगून टाकलं, "अन् आता विचारही नाही."

नंतर त्याच ओघात मी तिला विचारलं. "तुमचं सासर ?"

"इथलंच." ती म्हणाली.

"आता माझ्या सर्व लक्षात आलं. तिला आपल्या गावातील कुणाकडे दिलं तर ? आपण वरातीत पाहिलेला वर आपल्याच गावातला होता म्हणायचा... अरेरे !"

"मी आपल्याच विचारात असा गुंतलो असतानाच परत पावसाची कुरबुर सुरू झाली. तशी ती म्हणाली, "चला ! झटपट पाऊल उचला. इथं जवळच आमचं घर आहे. त्या समोरच्या झाडीत."

"त्या काळोखात मला खरं म्हणजे काही एक दिसलं नाही, पण ती समोर अर्धवट धावल्यासारखी झपाझप चालू लागली तसा मी ही तिच्या पाठोपाठ ओढल्यासारखा नकळत पावलं टाकू लागलो.

"त्या झाडीत खरोखरच एक बैठं घर असलेलं जवळ आल्यावर मला दिसलं. आम्ही प्रवेशद्वाराजवळ आलो तशी ती हाका मारू लागली. काही वेळानं दरवाजा करकरला अन् एक वृद्धा दारातून डोकावली. बारीक, फिक्कट नि सुरकुत्यांचं जाळं विणलेला चेहरा. आम्हाला पाहून तिच्या चेहऱ्यावर आनंद पसलेला तिच्या हातातील दिव्याच्या उजेडात मला दिसला."

"या ! या आत लवकर ! पाऊस जोरात यायला लागलाय !! ती वृद्धा म्हणाली."

आम्ही झटकन आत शिरलो अन् दुसऱ्याच क्षणी बाहेर मुसळधार पावसास सुरुवात झाली. आत बैठकीच्या खोलीत रॉकेलच्या दिव्याच्या उजेडात मला एक जुनं टेबल, एक दोन खुर्च्या अन् एक आराम खुर्ची दिसली. उघड्या, थंड हवेतून आल्यामुळे मला त्या बंदिस्त खोलीतील हवा जरा उबदार वाटली. मला बसावयास सांगून त्या दोघी आतल्या खोलीत गेल्या.

मी आराम खुर्चीतच रेललो. माझे डोळे पेंगायला लागले. खूप थकवा मला जाणवू लागला. दिवसभराच्या पाचसहा मैलांच्या पायपिटीनं तसंच पावसानं भिजलेले कपडे अंगावर वाळल्यानं गळाठल्यासारखं झालं होतं. मनावर अतिशय ताण पडल्यामुळे म्हणा किंवा आणखी कशानं म्हणा, पण मला एक प्रकारची ग्लानी येऊ लागली. थकलेल्या मनाला आता कसलाही विचार करण्याचं त्राण

उरलं नव्हतं. गावात आल्यापासून आतापर्यंत घडत आलेल्या अकल्पित नि विलक्षण घटनांवर विचार करून करून मनाच्या सर्व संवेदनाच आता बधिर होण्याच्या मार्गास लागल्या होत्या. पावसानं बाहेर अखंड सूर धरला होता. त्या लयबद्ध नादानं मला गुंगी आली.

''मला कदाचित एखादी जोराची डुलकीच लागली असावी, कारण मधलं दार खाडकन् बंद झाल्याच्या आवाजानं मी एकदम जागा झालो. रॉकेल स्टँडच्या प्रकाशात ती स्त्री माझ्यासमोर उभी असलेली मला दिसली. विवाहानंतरच्या पहिल्या मीलन रात्री माझ्या बायकोनं जसा साजशृंगार केला होता अगदी त्याच साजशृंगारात ! तसंच नेसलेलं हिरव्या रंगाचं पातळ, पिवळं पोलकं, हातात हिरवा चुडा, गळ्यात मंगळसूत्र, भरदार अंबाड्यावर माळलेली मोगऱ्याची वेणी अन् विडा खाऊन रंगलेले ओठ........

मी तिच्या डोळ्यात पाहिलं अन् तिच्या नजरेनं माझ्यावर चेटूक केलं! मी 'मेस्मराइझ' झाल्याप्रमाणे सर्व काही विसरलो. जणू काय विवाहानंतरची मधली वर्षे गुप्तच झाली होती. ती सारख्या चेहऱ्याची पण परकी स्त्रीच नव्हती. नुकताच आपला विवाह झाला असून ती पहिली रात्रच जणू काही परत अवतरली आहे असा मला भास झाला. ती खोली, तो मिणमिणता प्रकाश अन् आजूबाजूचं वातावरण माझ्या डोळ्यासमोरून नाहिसं झालं अन् 'ती विधवा स्त्री असा शृंगार का करील ? कोणत्या हेतूने करील ? कशासाठी करील ? वगैरे शंकाकुशंकासुद्धा मनात न येता तिचं तेच माझ्या अत्यंत परिचयाचं, लाडिक, मादक स्मित तिच्या मुखावर फुलताच एका अनिवार ओढीनं मी तिच्याकडे जाळ्यात सापडलेल्या भक्ष्याप्रमाणे ओढला गेलो. तिला आपल्या बाहुपाशात घट्ट धरून मी तिच्या लाललाल ओठांच एक प्रदीर्घ चुंबन घेतलं अन्--

वासनेच्या गरगरा फिरणाऱ्या भोवऱ्यात आम्ही दोघं सापडलो. स्थळकाळाचं भान न राहून अनेक दिवसांच्या उपाशी माणसाप्रमाणे मी समोर वाढून आलेलं सुख अधाशीपणानं भोगत राहिलो..... ओरबाडत राहिलो !...

''काही वेळानं मी शांत झालो नि त्याच क्षणी गाढ निद्रेनं माझ्यावर अंमल बसविला.''

तो इथं थांबला अन् डोकं मागं टेकवून त्यानं क्षणभर डोळे मिटले. त्याचं मन अजूनही त्या प्रसंगाच्या स्मृतीत रेंगाळलं असावं. इकडे माझ्या मनात तोवर अनेक प्रश्न उभे राहिले. 'ती स्त्री कोण असावी ?... ह्याला असं मोहात

पाडण्यात तिचा काय हेतु असावा ?.... कशी ?....

पुढील हकीकतीवरून आपल्याला सारं कळलेच असं मनाचं समाधान करून मी त्याच्या डोळे उघडण्याची वाट मोठ्या उत्सुकतेने पाहू लागलो.

क्षणभरानं त्यानं डोळे उघडले. एक मोठा सुस्कारा सोडून तो सरळ बसला. खंत वाटत असल्याप्रमाणे जड नि विषण्ण स्वरात माझ्याकडे एकटक पाहात तो सांगू लागला,

शुद्धीवर आल्यावर मला जे सत्य कळलं ते फार भयंकर होतं !... फार फार.... भयंकर होतं....! !.... मी जागा झालो तेव्हा मला दिसलं की झाडीत मी उघड्यावर पडलेलो आहे !

"ती स्त्री नव्हती, वृद्धा नव्हती की ते घरही नव्हतं !.... माझ्या बायकोच्या पिशाच्चानं उत्पन्न केलेली ती सर्व माया होती, विश्वास ठेवा माझ्यावर. मी खरं सांगतोय ! अगदी सत्य !!

अकाली मृत्युनं संसाराची वासना अतृप्त राहिल्यानं माझ्या बायकोच्या आत्म्याला मृत्युनंतर मुक्ती मिळाली नव्हती अन् तिच्या आत्म्यानं पिशाच्चयोनीत प्रवेश केला होता. जोवर माझ्या मनात तिची स्मृति कायम होती, तोवर त्या प्रेमभावनेच्या तरल आधारावर ती त्या योनीतही सुखात असावी. संसाराची मायावी सुख आपल्याच कोशात उत्पन्न करून, भोगत.......

पण नंतर लिलीच्या प्रेमानं माझ्या मनाचा कबजा घेतल्यानंतर तिचा त्या योनीतल्या सुखाचा एकमेव आधारच तुटल्यासारखा झाला असावा. तिच्या आत्म्याला आत्यंतिक यातना झाल्या असाव्यात. कारण भयंकर मत्सराच्या आधीन होऊन तिनं लिलीचा सूड घेतला - तिला जिवंतच ठेवलं नाही......

त्याचवेळी ती मलाही मारू शकली असती. पण मृत्युनं मी कदाचित मुक्त झालो असतो अन् तिचा त्या योनीतला एकमेव आधारच तुटला असता, मृत्युनंतर मीसुद्धा तिच्याच योनीत गेलो असतो ह्याची काय खात्री होती ? म्हणूनच तिनं नंतरचा सारा बनाव घडवून आणला होता - आपल्या मायेनं !

"माझ्या चिकित्सक मनानं दरवेळी तिला सारख्या चेहऱ्याची पण परकीच स्त्री मानलं म्हणून तिला ह्यात अडचणी आल्याच. पण शेवटी झाडीत आल्यावर मात्र तिनं माझ्या मरगळलेल्या मनावर पूर्ण पकड बसवलीच. अन् शेवटी घडू नये ते घडलं--"

एक मोठा निश्वास टाकून शरमेनं खाली मान घातलेल्या स्थितीत तो

स्तब्ध बसला, विचारांच्या गुंगीत !

मी खिडकीतून बाहेर पाहू लागलो. त्याची ती 'सत्यकथा' ऐकून माझ्या अंगावर काटा उभा राहिल. मस्तक बधीर झालं होतं. सुन्न होऊन मी काही वेळ बाहेरील अंधाराकडे दृष्टी लावून बसलो.

गाडी हळूहळू वेग कमी करीत एका छोट्या स्टेशनवर थांबली अन् मी भानावर आलो. एकाएकी माझ्या मनात प्रश्न उभा राहिला की तो पूर्वी म्हणाला त्याप्रमाणे तिनं ह्याचा कोणत्या प्रकारचा सूड घेतला ?

त्याला तसं विचारण्यासाठी मी डब्यात नजर वळवणार इतक्यात तोच मला फलाटावरून चालत जाताना दिसला. अन् मला दिसलं की फलाटावरील उभ्या असलेल्या एकुलत्या एक गॅस दिव्याखालून जाताना उजेडात त्याची सावलीच पडली नाही !

मला दरदरून घाम फुटला............